श्रीक्षेत्र जेजुरी गड विकास आराखडा
निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तिक्षेवि-२०१२/प्र.क्र.५/का.१४४४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ डिसेंबर, २०१५.

वाचा :-

१.शासन निर्णय क्रमांकः तिक्षेवि-२०१०/प्र.क्र.१०५/का.१४४४, दि.२२ फेब्रुवारी, २०११.
२.शासन निर्णय क्रमांकः तिक्षेवि-२०१२/प्र.क्र.५/का.१४४४, दि.१० सप्टेंबर, २०१४.
३.जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. नियो-८/निवि/१२९१/२०१५,दि.२० ऑक्टोबर, २०१५.

प्रस्तावना :-

श्रीक्षेत्र जेजुरी गड विकास आराखड्यासाठी उपरोक्त शासन निर्णय दिनांक १० सप्टेंबर, २०१४ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या ₹१८०.७८ लक्षच्या कामांसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्रीक्षेत्र जेजुरी गड विकास आराखड्यातील कामांसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांना ₹१२६.५४ लक्ष निधी वितरित करण्यात येत आहे.

२. सदरहू खर्च लेखाशिर्ष “मागणी क्र.ओ-८, मुख्य लेखाशिर्ष ३४५२-पर्यटन, ०१-पर्यटनसाठी पायाभूत सुविधा, १०१-पर्यटन केंद्रे, (००) (०४) श्रीक्षेत्र जेजुरी तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम (३४५२ २८११), २७ लहान बांधकामे, योजनातंर्गत (दत्तमत)” याखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. वर नमूद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेल्या खर्चाचा ताळमेळ घालण्यात यावा. वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अंदाज-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११५५४४८६३१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yatin Arvind Pimpley

Digitally signed by Yatin Arvind Pimpley
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Yatin Arvind Pimpley
Date: 2015.12.31 15:56:01 +05'30'

(य.अ.पिंपळे)
अवर सचिव.

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
३. वित्त विभाग (व्यय-८)/(अर्थ-१६) मंत्रालय, मुंबई.
४. जिल्हाधिकारी, पुणे.
५. जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७. नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती, का.१४४४, नियोजन विभाग, मुंबई.
